# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

**स. नं. २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,**

**पुणे ४११ ०१६**

## ५६ वा वार्षिक अहवाल

## (२०१८-१९)

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

## ५६ वा वार्षिक अहवाल
## (२०१८-१९)

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा अहवाल विधान मंडळाला सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे | ..... | ४ |
| २ | सन २०१८-१९ करीता संचालक मंडळाची यादी | ..... | ६ |
| ३ | ५६ वी स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना | ..... | ८ |
| ४ | संचालकांचा अहवाल | ..... | ९ |
| ५ | लेखापरिक्षकांचा अहवाल | ..... | १३ |
| ६ | ताळेबंद | ..... | २८ |
| ७ | नफा-तोटा पत्रक | ..... | २९ |
| ८ | ताळेबंद आणि नफा- तोटा यांना जोडलेल्या व त्याचा भाग असलेल्या वित्तीय टिपा आणि लेख्यांची महत्वाची धोरणे | ..... | ५० |
| ९ | भारताचे मा. नियंत्रक तथा महालेखा परिक्षक यांचे अभिप्राय (NRC) | ..... | ५४ |
| १० | सन २०१८-२०१९ या वर्षाचे लेखापरिक्षणातील त्रुटीबाबत महालेखाकार (लेखापरिक्षा II), महाराष्ट्र, नागपुर यांचे पत्र. | ..... | ५६ |
| ११ | सन २०१८-२०१९ या वर्षाचे लेखापरिक्षणातील त्रुटीबाबत महामंडळाची कार्यवाही | ..... | ५८ |


----*----

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

**सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा अहवाल विधान मंडळाला सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे :-**

- महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणीकृत असून महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम आहे.
- कंपनी कायदा २०१३ चे कलम ९६ अन्वये महामंडळाच्या दि. ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे लेखे दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ पूर्वी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये स्विकृत करुन घेणे आवश्यक होते.
- महामंडळाचे दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वर्षाचे लेख्यांचे वित्तीय तक्ते व ताळेबंद दिनांक ०६-१०-२०२० रोजीच्या परिपत्रकीय ठरावा अन्वये संचालक मंडळाने स्विकृत केले.
- भारताचे नियंत्रक तथा महालेखापरिक्षक, नवी दिल्ली यांचे आदेश क्र. सिए.व्ही / सीओवाय / महाराष्ट्र, एमएचफार्म (१) /७७४ दिनांक २१-०८-२०१८ अन्वये मे. एम. एस. गोडबोले आणि असोसिएटस्, सनदी लेखापाल यांची संविधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक केली. मे. एम. एस. गोडबोले आणि असोसिएटस्, सनदी लेखापाल यांनी महामंडळाचे दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वर्षाचे लेख्यांचे संविधानिक लेखापरिक्षण करुन दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी प्रमाणित केले.
- कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३ (६) (अ) अन्वये महालेखाकार (लेखापरिक्षा II), महाराष्ट्र, नागपुर यांनी महामंडळाच्या ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय लेख्यांचे पुरवणी लेखापरिक्षण दिनांक **१८-१२-२०२०** रोजी पूर्ण केले.
- कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३(६)(बी) अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी वित्तीय लेख्यांचे पुरवणी लेखापरिक्षणावरील अभिप्राय हे प्रधान महालेखाकार, महाराष्ट्र , नागपूर यांचे दिनांक १२-०३-२०२१ रोजीचे पत्रांन्वये या कार्यालयास दिनांक **१६-०३-२०२१** रोजी प्राप्त झाले.
- **सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे लेखे दिनांक २३-०४-२०२१ रोजी झालेल्या सभासदांचे ५६ व्या स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभे मध्ये स्विकृत करण्यात आले.**
- **त्यानंतर वार्षिक अहवाल छपाई करुन शासनास सादर करण्यात आला.**
- **वरील कारणांमुळे दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या सन २०१८-२०१९ या वर्षाचे लेखे विधान मंडळाला सादर करण्यास विलंब झाला.**

**----*----**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

**सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाला झालेल्या नफा संबंधीचा तपशील.**

सन २०१८-१९ या चालू वर्षात महामंडळाने **शासकीय कर्जावरील व्याज, घसारा, आयकर व मागील वर्षाची समायोजने पूर्व नफा रु. १९,७२.६१ लाख** मिळवला असून **शासकीय कर्जावरील व्याज, घसारा, आयकर व मागील वर्षाची समायोजने नंतर नफा रु. १८,३०.२९ लाख** झाला आहे.

**सन २०१८-१९ या वर्षात महाराष्ट्र शेती महामंडळाचे १४ मळयांवर एकूण २३,१७३ एकर क्षेत्रावर संयुक्त शेती योजना राबविण्यात आली आहे.**

३१ मार्च २०१८ रोजी संचित तोटा रु. १९४.७३ कोटी इतका होता आणि मागील वर्षाची समायोजने विचारात घेता **३१ मार्च २०१९ रोजी संचित तोटा रु. १७६.४३ कोटी आहे.**

**अ- खर्च :-**

सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षामधील खर्च तपशील खालीलप्रमाणे आहे.

**(रुपये लाखांत)**

| अ. क्र. | तपशील | २०१७-१८ रुपये | २०१८-१९ रुपये |
|---|---|---|---|
| १ | वेतन व मजूरी | ६१८.८४ | ५९७,२९ |
| २ | दुरुस्ती व निगा | ४.७२ | ८.५५ |
| ३ | आस्थापना खर्च | ७८.१५ | १०६.६६ |
| ४ | संचालकांचे परिश्रमिक आणि खर्च | २५.६१ | २२.८१ |
| ५ | **व्याज** | **५४२.६६** | **११८.६८** |
| ६ | व्यवसायातील व प्रक्रियेतील साठयातील घट | २२४.३१ | ३७.३५ |
| ७ | मत्तावरील घसारा | १३.०८ | १३.६२ |
| ८ | आयकरासाठी तरतूद | ४७.४७ | ५१.३५ |
| | **एकूण :-** | **१५५४.८४** | **९५६.३१** |
| ९ | **मागील वर्षाचे संबंधित खर्च** | १२४.८२ | ०.०० |
| | **एकूण** | **१६७९.६६** | **९५६.३१** |

**ब - उत्पन्न :-**

सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षातील तुलनात्मकदृष्टया महसूली जमा खालीलप्रमाणे आहे -

**(रुपये लाखांत)**

| अ. क्र. | तपशील | २०१७-१८ रुपये | २०१८-१९ रुपये |
|---|---|---|---|
| १ | **व्यवहारातून मिळालेले उत्पन्न** | | |
| | अ. संयुक्त शेती पासून | १८,००.४३ | २३,१६.६७ |
| | ब. वृक्षशेती व फळे पासून | ८.०० | ११.६६ |
| २. | **इतर उत्पन्न (ठेवीवरील व्याज/वापरमूल्य सह)** | ३८,४०.४२ | ४,१६.९४ |
| ३. | **मागील वर्षाचे संबंधित उत्पन्न** | ०.०० | ४१.३३ |
| | **एकूण :-** | **५६,४८.८५** | **२७,८६.६०** |

| | | | |
|---|---|---|---|
| क | **नफा/(तोटा)** | **३९,६९.१९** | **१८,३०.२९** |
| ड | **संचित तोटा** | **१९४,७२.८९** | **१७६,४२.६०** |

**----*----**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

## संचालक मंडळ २०१८-२०१९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील**<br>मा. मंत्री (महसूल), महाराष्ट्र राज्य, (दि.०८-०७-२०१६ पासून) | ..... | **अध्यक्ष** |
| २ | **मा. ना.श्री. संजय राठोड**<br>मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य. (दि.०५-१२-२०१४ पासून) | ..... | **उपाध्यक्ष** |
| ३ | **मा. श्री. मनुकूमार श्रीवास्तव, भा.प्र.से.**<br>अपर मुख्य सचिव, (महसूल),महाराष्ट्र राज्य. (दि.०६-०१-२०१५ पासून) | ..... | **संचालक** |
| ४ | **मा. श्री. मनोज सौनिक, भा.प्र.से.**<br>अपर मुख्य सचिव, (वित्त),महाराष्ट्र राज्य. (दि.२३-१०-२०१८ पासून) | ..... | **संचालक** |
| ५ | **मा. श्री. एस. चोक्कलिंगम, भा.प्र.से.**<br>जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>(दि.०३-१०-२०१७ पासून) | ..... | **संचालक** |
| ६ | **मा. डॉ. विजय एन. झाडे, भा.प्र.से.**<br>सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (दि.२४-०७-२०१७ ते ०२-०९-२०१८)<br>**मा. डॉ.सतीश सोनी, भा.प्र.से.**<br>सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (दि.२१-०९-२०१८ ते २०-०९-२०१९) | ..... | **संचालक** |
| ७ | **मा. श्री. संभाजी कडु पाटील, भा.प्र.से.**<br>साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य. (दि.२५-०४-२०१७ ते ३१-१२-२०१८)<br>**मा. श्री. शेखर गायकवाड, भा.प्र.से.**<br>साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य. (दि.०१-०१-२०१९ ते २१-०१-२०२०) | ..... | **संचालक** |
| ८ | **मा. श्री. सुनिल केंद्रेकर, भा.प्र.से.**<br>कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (दि. १५-०५-२०१७ ते ३१-०८-२०१७)<br>**मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह, भा.प्र.से.**<br>कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (दि. ३१-०८-२०१७ ते ०७-०२-२०१९)<br>**मा. श्री. सुहास दिवसे, भा.प्र.से.**<br>कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (दि. ०८-०२-२०१९ ते १३-०७-२०२०) | ..... | **संचालक** |
| ९ | **मा. श्री. सी. अे. बिराजदार,**<br>सचिव (लाभक्षेत्र विकास) पाटबंधारे, महाराष्ट्र राज्य. (दि.०१-०६-२०१७ पासून ते ३१-०५-२०१८)<br>**मा. श्री. अे. व्ही. सुर्वे,** (अति.कार्य)<br>सचिव (लाभक्षेत्र विकास) पाटबंधारे, महाराष्ट्र राज्य. (दि.०१-०६-२०१८पासून ते ३०-११-२०१८)<br>**मा. श्री. राजेंद्र पवार**<br>सचिव (लाभक्षेत्र विकास) पाटबंधारे, महाराष्ट्र राज्य. (दि.०१-१२-२०१८ पासून ते ३१-०७-२०२०) | ..... | **संचालक** |
| १० | **मा.श्री. किरण भालचंद्र कुलकर्णी**<br>मुख्य अभियंता, पाटबंधारे नाशिक (दि.०१-०१-२०१८ ते १३-०१-२०२१) **.** | ..... | **संचालक** |
| ११ | **मा.श्री. आर. बी. भागडे, भा.प्र.से.**<br>व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित (दि.१२-०९-२०१६ पासून) | ..... | **संचालक** |

**खालील संचालक मंडळाने महामंडळाच्या दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या सन २०१८-१९ या वर्षाचे वित्तीय तक्त्यासह वार्षिक अहवाल आणि  ताळेबंद यास दिनांक ०६-१०-२०२० रोजीचे परिपत्रकीय ठरावान्वये संमती दिली.**

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | **मा. ना. श्री. बाळासाहेब थोरात**<br>मा. मंत्री (महसूल), महाराष्ट्र राज्य. | ..... | **अध्यक्ष** |
| **२** | **मा. ना.श्री. अब्दूल सत्तार**<br>मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य. | ..... | **उपाध्यक्ष** |
| **३** | **मा. श्री. नितिन करीर, भा.प्र.से.**<br>अपर मुख्य सचिव, (महसूल),महाराष्ट्र राज्य. | ..... | **संचालक** |
| **४** | **मा. श्री. मनोज सौनिक, भा.प्र.से.**<br>अपर मुख्य सचिव, (वित्त),महाराष्ट्र राज्य. | ..... | **संचालक** |
| **५** | **मा. श्री. एस. चोक्कलिंगम, भा.प्र.से.**<br>जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे | ..... | **संचालक** |
| **६** | **मा. डॉ. अनिल कवडे, भा.प्र.से.**<br>सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे | ..... | **संचालक** |
| **७** | **मा. श्री. शेखर गायकवाड, भा.प्र.से.**<br>साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य. | ..... | **संचालक** |
| **८** | **मा. श्री. धिरज कुमार, भा.प्र.से.**<br>कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे | ..... | **संचालक** |
| **९** | **मा. श्री. संजय घाणेकर,**<br>सचिव (लाभक्षेत्र विकास) पाटबंधारे, महाराष्ट्र राज्य. | ..... | **संचालक** |
| **१०** | **मा.श्री. आर. बी. भागडे, भा.प्र.से.**<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित. | ..... | **संचालक** |
| **११** | **मा. श्रीमती. वर्षा लड्डा- उंटवाल,**<br>मुख्य कार्यकारी (प्रशासन),<br>महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित. | ..... | **सचिव** |

**<u>नोंदलेले कार्यालय :</u>**

स.नं. २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६
फोन नं. २५६५०५५१, २५६५०५५५, २५६५९५५३  फॅक्स नं. २५६५९८४३

**<u>लेखापरिक्षक :</u>**

एम. एस. गोडबोले आणि असोसिएटस
सनदी  लेखापाल
६७/२, ४, उबेरॉय हाऊस, कर्वे रोड,
नळस्टॉप, पुणे - ४११ ००४.

**----*----**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

**नोंदलेले कार्यालय**
**स.नं. २७०, भांबुर्डा,**
**सेनापती बापट मार्ग,**
**पुणे - ४११ ०१६**

क्रमांक : सचिव/१८-१९/५६वी अेजीएम/२०२१ /७४८ दिनांक १८/०३/२०२१

**<u>५६ वी स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना</u>**

या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या सभासदांची स्थगित झालेली ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार **दिनांक २३ एप्रिल २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या सर्व्हे नंबर २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ येथील व्यवस्थापकीय संचालक यांच्या दालनामध्ये स्थगित झालेले पुढील काममाज पुर्ण करण्यासाठी भरविण्यात येईल.

१. दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वर्षासंबंधीच्या महामंडळाचे वित्तीय तक्ते / निधी ओघ पत्रक, नफा-तोटा पत्रक आणि ताळेबंद तसेच लेखा परिक्षकांचा आणि संचालकांचा अहवाल विचारात घेणे व स्विकृत करणे.

सही/-
(श्रीमती वर्षा लड्डा-उंटवाल)
कंपनी सचिव.
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे
संचालक मंडळाकरीता व त्यांच्यावतीने**.**

स्थळ: पुणे
दिनांक : १८/०३/२०२१

**<u>टीप:</u>** सभेस उपस्थित राहाणाऱ्या व मतदान करण्याचा हक्क असलेल्या सभसदाला स्वत:ऐवजी उपस्थित राहण्यासाठी प्रतिनिधी नेमण्याचा हक्क आहे. हा प्रतिनिधी सभासद असण्याची आवश्यकता नाही.

प्रति,
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, २०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ चे भागधारक व कंपनी लेखापरिक्षक यांस.

**----*----**

# <u>महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे - ४११ ०१६.</u>

(महाराष्ट्र शासनाचा अधिकृत उपक्रम)

## संचालकांचा अहवाल २०१८-२०१९

प्रति,
सदस्य यास,

सन २०१८-२०१९ या वर्षातील महामंडळाच्या कामकाजाबद्दलचा हा ५६ वा वार्षिक अहवाल सादर करताना आपल्या संचालकांना अतिशय आनंद होत आहे. या अहवालासोबत या कालावधी करीता लेखा परिक्षकांचा अहवाल व भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांची विवरण पत्रेही सादर करण्यात आली आहेत.

**२. वार्षिक सर्वसाधारण सभा.**

महामंडळाच्या ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या सन २०१८-२०१९ या वर्षाचे लेख्यांचे तक्ते/ निधी ओघ पत्रक, नफा - तोटा पत्रक व ताळेबंद त्यावरिल लेखापरिक्षकांचा अहवाल व भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अभिप्रायासह दिनांक ३०/९/२०१९ रोजी किंवा त्यापुर्वी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये स्विकृतीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे कार्यालय नवी दिल्ली यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक २१-०८-२०१८ द्वारे सन २०१८-२०१९ या वर्षाचे लेखे तपासणीसाठी **मे. एम. एस. गोडबोले ॲण्ड असोसिएटस, सनदी लेखापाल, पुणे** यांची लेखापरिक्षक म्हणून नेमणुकीचा आदेश काढला आहे.

सन २०१८-२०१९ या वर्षाचे लेखा परिक्षण झालेले लेखे भागधारकांच्या स्विकृतीसाठी सादर केले आहेत.

**३. भाग भांडवल**

महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल चालू वर्षी (३१ मार्च २०१९ अखेर ) रु. ३ कोटी इतके राहीले आणि अभिदत्त व भरणा केलेले भांडवल रु. २.७५ कोटी इतके राहिले.

**<u>वित्तीय परिणाम</u>**

| | | २०१८-२०१९ **(रुपये लाखात)** | २०१७-२०१८ **(रुपये लाखात))** |
|---|---|---|---|
| १ | संयुक्त शेती पासून मिळालेला निधी | **२३,१६.६७** | **१८,००.४३** |
| २ | वृक्ष शेती आणि फलोद्यान पासून मिळालेला निधी | **११.६६** | **८.००** |
| ३ | इतर जमा | **४१,६९.४२** | **३८,४०.४२** |
| ४ | घसारा, व्याज, कर तरतूदी व मागील वर्षाचे खर्चापूर्वी येणारा स्थूल नफा / (तोटा) | **१९,७२.६१** | **४६,९७.२२** |
| ५ | घसारा, व्याज, कर तरतूदी व मागील वर्षाचे खर्चानंतर येणारा नफा | **१८,३०.२९** | **३९,६९.१९** |
| ६ | सुचविलेला लाभांश | **०.००** | **०.००** |
| ७ | वर्ग केलेली निव्वळ शिल्लक | **(-)१७६,४२.६०** | **(-)१९४७२.८९** |
| ८ | गुंतविलेले भांडवल | **(-) ३९,३५.८२** | **(-) ५८७५.९५** |
| ९ | अभिदत्त भरणा केलेले भांडवल | **२,७५.००** | **२,७५.००** |
| १० | निव्वळ मूल्य | **(-) १७३,६७.५९** | **(-) १९१९७.८८** |

**४. बोनस**

महामंडळाने सन २०१८-२०१९ या वर्षामधील लेख्यांमध्ये ८.३३% बोनसच्या रकमेची तरतुद केलेली आहे.

**५. पीक योजना**

सन २०१८-२०१९ मध्ये महामंडळाने संयुक्त शेती पीक योजनेनुसार एकुण २३,१७३ एकर क्षेत्रावर संयुक्त शेती राबविलेली आहे आणि त्यापासून महामंडळास रक्कम रुपये २३,१६.६७ लाख उत्पन मिळाले आहे.

**६. कर्मचारी वर्ग आणि औद्योगिक संबंध**

अहवाल वर्षी (३१ मार्च २०१९ अखेर) महामंडळामध्ये ६१ कायम कर्मचारी, ४ शासन प्रतिनियुक्ती अधिकारी तसेच बाहृय एजन्सीमार्फत घेतलेले कर्मचारी, सुरक्षा वॉचमन व महामंडळाचे सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी एकुण ८८ आणि ७९ नैमित्तिक कर्मचारी कार्यरत होते.

व्यवस्थापन व कामगार यांच्यातील सर्वसाधारण संबंध सलोख्याचे राहिले. काही मळयावरील कामगारांनी किरकोळ स्वरुपाचे आंदोलनाचा मार्ग स्विकारला परंतु अशी आंदोलने फार थोडी होती.

**७. संचालक मंडळाच्या बैठका**

अहवाल वर्षी संचालक मंडळाची दिनांक २७-०२-२०१९ रोजी एक बैठक झाली.

**८. संचालकांची जबाबदारी**

कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदीस अनुसरुन कंपनीचे अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर संचालक मंडळ त्यांची जबाबदारी सादर करीत आहे :-

अ) वार्षिक लेखे हे लेख्यांचे नियमानुसार तयार केलेले असुन त्यामध्ये तफावत नाही.

ब) संविधानी लेखापरिक्षक यांचे सल्ल्यानुसार लेख्यांची धोरणे विचारात घेतलेली असून कायमपणे वापरलेली आहेत. घेतलेले निर्णय आणि इतर बाबी योग्य असून आर्थिक वर्ष अखेरीचे म्हणजेच दिनांक ३१ मार्च २०१९ अखेरचे कंपनीचे कामकाज आणि नफा-तोटा पत्र सत्य आणि योग्य दर्शवितात.

क) कंपनीचे मालमत्तेची सुरक्षितता आणि इतर अनियमितता, फसवणूक निदर्शनास येऊन त्यास प्रतिबंध होईल अशा पध्दतीने कंपनी कायदा २०१३ चे तरतुदीस अनुसरुन लेख्यांच्या नोंदी ठेवलेल्या आहेत. त्याबाबत त्यांचे मतानुसार त्यांनी योग्य आणि पुरेशी काळजी घेतली आहे.

ड) कंपनीचे कामकाज चालू राहील या तत्वावर वार्षिक लेखे तयार केलेले आहेत.

इ) सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता होईल अशी योग्य नियंत्रण पध्दत राबविली असुन सदर नियंत्रण पुरेसे व प्रभावी आहे.

**९. कृतज्ञता :**

अहवाल वर्षी महामंडळाच्या कर्मचा-यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल संचालक समाधान व्यक्त करीत आहेत. महामंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात राज्य शासनाच्या विविध विभागांनी दाखविलेल्या सहकार्याबद्दल संचालक कृतज्ञ आहेत. महालेखाकार (वाणिज्यिक लेखापरिक्षण) मुंबई आणि संविधानिक लेखा परिक्षक मे. एम. एस. गोडबोले ॲण्ड असोसिएटस, सनदी लेखापाल, पुणे यांनी महामंडळास वेळोवेळी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल महामंडळ त्यांचे आभारी आहे.

**संचालक मंडळाकरीता व त्यांच्यावतीने.**

**सही**
**अध्यक्ष.**

**परिशिष्ट**

**कंपनी कायदा १९५६ मधील कलम २१७ (२ अ) अन्वये आवश्यक तक्ता.**

सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात आर्थिक मोबदला रुपये ६० लाख किंवा अधिक असणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी

**निरंक**

**-----*-----**

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे - ४११०१६**

**३१ मार्च २०१९ ला असल्याप्रमाणे ताळेबंद**

**आणि**

**३१ मार्च २०१९ ला संपलेल्या वर्षाचा नफा तोटा लेखा**

**सोबत**

**वित्तीय टिपा ३१ मार्च २०१९ ला असलेल्या**
**लेख्यांना जोडलेल्या व त्याचा भाग असलेल्या**

**आणि**

**लेखापरिक्षकांचा अहवाल**

# एम. एस. गोडबोले आणि असोसिएटस
## सनदी लेखापाल
**कार्यालय नं. ६७/२, ४, उबेरॉय हाऊस,**
**नळस्टॉप, कर्वे रोड, पुणे - ४११ ००४.**
**दूरध्वनी नं. ०२०-२५४३३५४०/२५४२१६५७**
**ई-मेल -mgodbole1961@gmsil.com**


---

## लेखापरिक्षकाचा स्वत:चा अहवाल.

**प्रति,**

**सभासद, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित**

**वित्तीय तक्त्यांवरील अहवाल:**

आम्ही महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, ("कंपनी") यांचे ३१ मार्च २०१९ रोजीचे ताळेबंद आणि ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा पत्रकाची तक्ते आणि सारांशातील लेख्यांची महत्वपुर्ण धोरणे व स्पष्ट करणारी इतर माहिती यांचे लेखा परिक्षण केलेले आहे.

**आर्थिक तक्त्यांबाबतची व्यवस्थापनाची जबाबदारी :**

कंपनी कायदा, २०१३ ("द ॲक्ट") चे कलम १३४ (५) मध्ये नमूद केलेप्रमाणे सदर वित्तीय तक्ते हे आर्थिक आढावा, आर्थिक परिस्थीती बाबत सत्यता आणि योग्यता दर्शविणारी तक्ते आणि भारतामध्ये सर्वसाधारण स्विकारलेली लेख्यांची तत्वे यासह कायदा मधील कलम १३३ मधील कंपनीज (अकौंटस्) नियम, २०१४ मधील नियम ७ च्या नूसार कंपनीचा रोखीचा प्रवाह तक्ता तयार करण्याची जबाबदारी ही कंपनीच्या व्यवस्थापनाची आणि संचालक मंडळाची आहे. याशिवाय या जबाबदारीमध्ये कायद्यातील तरतुदीस अनुसरुन कंपनीची मालमत्ता सुरक्षीत असणे करीता आवश्यक तेवढा लेख्यांचा तपशील ठेवणे आणि इतर अनियमितता आणि अफरातफर नजरेस येईल आणि त्याला आळा बसेल अशी लेख्यांची यथायोग्य धोरणे अवलंबीणे जेणे करुन परिणामी निर्णय आणि प्रमाणितता हि योग्य, भक्कम आणि चाकोरीत असतील. तसेच लेख्यांची माहिती हि अचूक आणि परिपूर्ण खात्रीशीर परिणामकारक असणे करीता अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची अंमलबजावणी आणि पुर्तता करणेची जेणे करुन संबंधीत आर्थिक तक्ते तयार करुन सादर केलेली हि अफरातफर किंवा चुकीमुळे अयोग्य दाखविली जात नाहीत ना तसेच खरे आणि योग्य दाखविले जातात याचाही समावेश होतो.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी :**

ज्या आर्थिक तक्त्यांचे आधारावर आमचे लेखापरिक्षण आहे त्यावर आमचे मत दर्शविणे हि आमची जबाबदारी आहे.

भारताची कायद्यातील तरतूदी आणि त्यामधील नियमानुसार लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट करावयाचे आवश्यक असणाऱ्या बाबी, लेख्यांची आणि लेखापरिक्षणाची प्रमाणिकरण, कायद्यातील तरतुदी इत्यादि या विचारांत घेतलेल्या आहेत. आम्ही नितीशास्त्राची पूर्तता करुन आर्थिक तक्ते हे अवाजवी चुकीचे दर्शवित नाहीत याची पुरेशी खात्री लेखापरिक्षणातून मिळणेकरीता, त्यानुसार नियोजन करुन लेखापरिक्षण करुन लेखापरिक्षण करावे अशी अपेक्षा या प्रमाणीकरणाची असुन त्यानुसार आम्ही कायद्यातील कलम १४३ (१०) मध्ये नमुद केलेल्या लेखापरिक्षणाची प्रमाणिकरण यास अनुसरुन लेखापरिक्षण केले आहे.

आर्थिक तक्त्यातील रक्कम आणि प्रगटीकरण बाबतचे पुरावे मिळविता येतील अशी पध्दत लेखापरिक्षणात अंतर्भूत करण्यात आली आहे. लेखापरिक्षणाची निवड केलेली पध्दत हि लेखापरिक्षकांचे निर्णय तसेच फसवणूक किंवा चूक यामुळे आर्थिक तक्ते चुकीचे विधान दर्शवित नाहीत ना या बाबतची वस्तुस्थिती पडताळणीतले धोरणे विचारात घेऊन त्यावर आधारलेली आहे.

वित्तीय तक्ते तयार करतांना आणि त्याची सत्यता दर्शवितांना यासंबंधी कंपनीचे असलेले अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दत व पडताळणीतील धोके विचारात घेऊन त्यानुसार लेखापरिक्षणाची पध्दत व आखणी केली असून जेणे करुन त्या परिस्थितीत ती योग्यच आहे. कंपनीच्या संचालकांनी वापरलेली लेख्यांची धोरणे ही उचित असलेबाबतचे मुल्यमापन आणि तयार केलेले लेखेबाबतची योग्यता तसेच एकंदरीत वित्तीय तक्त्यांचे सादरीकरण बाबतचे मुल्यमापण याचा लेखापरिक्षणात समावेश केलेला आहे.

लेखापरिक्षणात आम्हास मिळालेले वित्तीय तक्त्यांवर आमचे मत दर्शविणेस पुरेसे आणि उचित आहेत यावर आमचा विश्वास आहे.

**उचित मत बाबतचे आधार :**

**१.** रोखीचा प्रवाह तक्ता कंपनीने तयार केला आहे. तथापि लेख्यांचे प्रमाणीकरण ३ मधील आवश्यकतेनूसार काही बाबींची कमतरता असल्याने भरवसा ठेवता येणार नाही.

**२.** महामंडळाने लेख्यांची नोंदबुक हस्तलिखीत ठेवलेली आहेत. त्यामुळे संगणकीय लेखे उपलब्ध झाली नाहीत म्हणून काही प्रमाणात कपात पध्दत, आवश्यक लेख्यांची समायोजने निश्चिती, विशीष्ट मुलभूत बाबींचे ताळमेळाचे संकलन, काही खर्च व उत्पन्नाचे लेखे या बाबींवर अंतर्गत नियंत्रणाचा प्रभाव निश्चित सांगता येत नाही.

**३.** अनुसूची क्र. ३ क मध्ये दर्शविलेली माल खरेदी करीता किरकोळ धनको, मत्ता खरेदी करीता किरकोळ धनको, इतर अनामत आणि इतर किरकोळ धनको अनुक्रमे रु. ४५,३०,७९०/-, रु. १,०२,०३,३१०/-, रू. १७,४६,२१,०६४/- आणि रु. ६,३२,७७,५७६/- याबाबत रुजूवात केलेली नाही.

**४.** तरीही कंपनीने दिर्घ मुदतीचे दायित्व मध्ये दाखविलेली आहेत. त्यामुळे या बाबींचा वित्तीय तक्त्यांवरील परिणाम निश्चित करता येऊ शकत नाही.

**५.** अनुसूची क्र. ४ ड मध्ये कृषी आयकर रक्कम रु. ३,२८,१६,४९८/- ची तरतूद दिसत असून ती सन १९८३-१९८४ पेक्षाही जास्त वर्षापासून पुस्तकात दिसत आहे. परंतू सदर रक्कम ही शासनास दिली नाही आणि त्याबाबत रुजूवात करून दायित्वाची खात्रीपण केली नाही. जर त्यावर काही व्याज किंवा दंड असल्यास त्या विचारात न घेता सदर दायित्व पूर्वीप्रमाणेच पुढे चालू ठेवली आहे.

**६.** रक्कम अनुसूची क्र. ४ ड मधील सेवाउपदानाची तरतूद रु. २,६५,६९,६२८/-, ही व्यवस्थापनाने योग्य आधारावर अंदाजित केलेली आहे. तथापि सदर तरतूद ही विमागणक शास्त्रावर आधारित नाही म्हणून लेख्यांचे प्रमाणीकरण १५- कर्मचारी कल्याण नूसार केलेली नाही. सदर रक्कम ही अहवाल दिनांकापासून १२ महिन्यात अदा होईल असे अपेक्षित नाही तरीसुद्धा त्याचे चालू दायित्व मध्ये वर्गीकरण केले आहे.

**७.** खालील मुद्दे पाहता लेख्यामधील स्थिर मत्तांचे मुल्यांकन हे लेख्यांचे प्रमाणीकरण १० नूसार केलेले नाही.
अ) अपूरे ठेवलेल्या नोंदी आणि प्रत्यक्ष तपासणी :

१. कंपनीने जमीनीसह स्थिर मत्ता बाबतच्या नोंदी हया त्याबाबतची संख्यात्मक तपशिलासह सविस्तर तपशील आणि सध्याची जागा तसेच चालू स्थिती बाबतचा तपशिल पुरेसा ठेवलेला नसून पुर्ण तपशिल दर्शवित नाहीत. याबाबत व्यवस्थापनाने आम्हास सांगितले की, स्थिर मत्ता रजिस्टर तयार केलेले आहे. परंतू ते बरेच कालावधी पासून आद्ययावत केलेले नाही.

२. मागील नऊ वर्षापेक्षा जास्त कालावधीत स्थिर मत्तांची प्रत्यक्ष तपासणी केलेली नाही. म्हणून स्थिर मत्तांची प्रत्यक्ष तपासणीचा कालांतर बाबतची योग्यता ही अपूरी आहे.

३. सक्तीने संपादन केलेली जमिनीचे शासनाकडून निवाडा (अवार्ड) प्राप्त न झाल्याने त्याची समायोजने लेख्यांमध्ये प्रलंबित आहे आणि संपादनातून मिळालेली रक्कम इतर किरकोळ ऋणको या शिर्षकाखाली दर्शविलेली आहे. (अनुसूची क्र. ३ क मधील मूद्दा क्र ७ बाबत टिप क्र. क पहा)

**ब) वादग्रस्त मत्ता :**

१. व्यवस्थापनाने दिलेल्या खुलाशानुसार अनुसुची क्र. ५ टिप ब मध्ये नमुद केलेल्या मत्तांचे मुल्यांकन हे सन १९६३-६५ मध्ये शासनाने केले होते. परंतु तेव्हापासून ते वादग्रस्त आहेत.

२. कंपनीने अनुसुची क्र. ५ टिप ब मध्ये नमुद केलेप्रमाणे विशिष्ट मत्तांचा भांडवलात समाविष्ट न करता त्यावर घसारा रू. ५४,९०६/- ची तरतुद केली आहे, व्यवस्थापनाने दिलेल्या खुलाशानुसार महाराष्ट्र शासनाने सदर मत्तांचे मुल्यांकन रक्कम रु. ३५,२६,२१७/- केलेले असून सन १९६३-६५ पासून वादग्रस्त आहेत आणि ज्या साखर कारखान्यांकडून मत्ता संपादित केल्या होत्या ते महाराष्ट्र शासनाने केलेले मत्तांचे मुल्यांकन यास सहमत झाले नाहीत त्यामुळे त्यांनी विक्रीचा अंतिम व्यवहार पुर्ण केला नाही. तसेच या मत्तांचे हक्काबाबतची पडताळणी प्रलंबित आहे.

३. आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणास अनुसरून कंपनीने रक्कम रु. ३५,२६,२१७/- कोटी पैकी रु. ३१,९९,५३७/- अग्रिम दिला आहे. शिल्लक रक्कम ही कंपनीकडून दिलेली नाही आणि कंपनी देणे किंवा दायित्व म्हणून अभिस्विकृत केलेले नाही.

**४.** त्याचप्रमाणे बेलापूर फार्म बाबत - कंपनीने बेलापूर शुगर आणि अलाईड इंडस्ट्रिज लि. यांची मत्ता संपादित केली असून सदर मत्तांचे किंमतीबाबत वाद आहेत. बेलापूर शुगर आणि अलाईड इंडस्ट्रिज लि. नी सदर मत्तां ची किंमत रु. २७,७२,७३४.५०/- (की जी एमएसएफसीएल ने अदा करावयाची) केली आहे. तसेच एमएसएफ -सीएल नी या मत्तांची किंमत रु. १३,७७,५२०.३३/- केली असून हि बाब वादात आहे.

एमएसएफसीएल ने रक्कम रु. १३,७७,५२०.३३/- या मत्ता पोटी अग्रिम दिलेला दर्शविला आहे. (अनुसूची क्र. ६ चालू भांडवली कामे रु. ५३,४०,८५४/-) आणि रु. १३,९५,२१३.६७/- हि अल्प मुदतीची कर्ज व आगाऊ रक्कमा {अनुसूची क्र. १२ (ब) उचित न समजलेले रु. २,११,२१,६८५/-} मध्ये दर्शविली आहे. सदर मत्ता वापरात असून त्याचे फायदे घेत आहेत, तरी त्या ताळेबंद यात मत्ता म्हणून दर्शविलेल्या नाहीत.

**क) प्रलंबीत वादग्रस्त बाबींबाबत अनिश्चितता**

**१.** आम्ही आणखी अशाच रक्कमेबाबत उल्लेख करतो की व्यथित इंपिरिअल इरिगेशनचे मालक यांनी न्यायालयात दाखल केलेल्या कोर्ट केस प्रकरणी कंपनीने रु. ८०,३०,०००/- कोर्टामध्ये जमा केले असून कंपनीने सदर रक्कम अनुसूची क्र. १२ मुद्दा क्र. १ अ - कर्ज आणि आगाऊ (उचित समजलेले) दर्शविलेले आहे.

**२.** तसेच आम्ही आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की सेवा उपदानासंदर्भात कामगार संघटनेने दाखल केलेल्या वादग्रस्त प्रकरणात महामंडळाने रु. २,२६,९८,५००/- कोर्टात जमा केलेले आहे. कंपनीने सदर रक्कम अनुसूची क्र. १२ मुद्दा क्र. ३ टिप क्र. 'इ' - अल्प मुदतीची कर्ज आणि आगाऊ रकमा (सुरक्षा ठेव म्हणून) दर्शविलेले आहे.

**३.** आमचे मते कंपनीकडून जमीन संपादन पध्दती, मुल्यांकने आणि जमीन संपादनातील वाद याबाबत अधिक प्रगटन आणि स्पष्टता असण्याची आवश्यकता आहे. तसेच द्रव्यानिधी/जमीन वाटप पध्दत हि न्यायालयीन वाद संपुष्टात आलेनंतर करावी.

**४.** कंपनीवर असलेल्या सर्व न्यायालयीन प्रकरणांबाबत कायदेशीर मत आम्हास मिळाले नाही.आणि म्हणून आम्हास कंपनीवर असलेल्या न्यायालयीन प्रकरणाची सद्य स्थितीची पडताळणी करणे शक्य झाले नाही आणि या न्यायालयीन प्रकरणाचा एकंदरीत कंपनीचे वित्तीय तक्त्यांवर होणाऱ्या परिणाम बाबत आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही.

**ड) शासनाने संपादित केलेली जमीन**

१. शासनाने सुमारे १४८० एकर जमीन शासनाच्या प्राधिकारांत संपादित केल्या आहेत असे अनुसूची क्र. ३ टिप (क) आणि अनुसूची क्र. ५ टिप (इ) मध्ये नमूद केले आहे. दि. ३१.०३.२०१९ अखेर एकूण नुकसान भरपाई रक्कम रु. ४१६.८३ लाख मिळाली आहे. सदर जमीनीचा कायदेशीर हक्क महामंडळाकडे असून त्यांचे अंतिम निवाडा (ॲवॉर्ड) अद्यापही झालेला नाही म्हणून सदर रक्कम ही चालू नसलेली दायित्व मध्ये "इतर किरकोळ धनको" या लेखाशिर्षाखाली दर्शविली आहेत. कंपनीने त्याचे बरोबर संबंधित मत्ता एकूण मत्तांमधून काढून टाकल्या नाहीत. जरी कंपनीचे या जमीनीवर नियंत्रण राहिलेले नाही आणि प्रत्यक्ष शासनाने संपादित केलेल्या आहेत तरी कंपनी सदर जमीन स्थिर मत्तांमध्ये अव्यहातपणे दर्शवित आहे हे आमचे मते चूकीचे आहे.

२. त्यामुळे शासनाने सक्तीने संपादित केलेल्या वरील जमीन बाबतचे लेखांकन करताना नफा/तोटा काढला नाही आणि त्यांचे लेखांकन पण केले नाही**.**

**इ) खंडकऱ्यांना जमीन वाटप**

१. अनुसूची क्र. ५ टिप (इ) मध्ये दर्शविलेनुसार सुमारे १४२६१ एकर जमीन खंडकऱ्यांना वाटप केले आहे. सध्या आणखी लॉट मध्ये २३८०९ एकर जमीन वाटप केली आहे. तथापि अनुसूची क्र.५ टिप (ग) नुसार वाटप प्रक्रियेत किती जमीन वाटप होईल हे वाटप प्रक्रिया संपूर्ण झालेनंतरच उपलब्ध होईल. म्हणजेच या वाटप पध्दतीने पुढील वाटपाकरिता आणखीन अजून किती जमीन लागणार आहे आणि कंपनीकडे किती शिल्लक राहिल हे निश्चित करता येत नाही.

**फ)** खंडकऱ्यांना जमीनी परत केले बाबतचे सविस्तर आणि योग्य कागदोपत्री पुरावा आमचे पडताळणी करीता उपलब्ध करुन दिले नाहीत. तथापि जमीन वाटप पध्दतीत अनियमितता झाली नसलेबाबत व्यवस्थापनाने दर्शीत केले आहे.

**ग)** कंपनीचे एकूण जमीन क्षेत्र ८२,२३१ एकर पैकी १,४१८ एकर जमीनीवर अतिक्रमण असलेबाबत तसेच त्या संबंधी सुमारे ४०४ एकर बाबत न्यायालयात प्रलंबित आहे अशी माहिती मिळाली. हि वस्तूस्थिती यापूर्वीच्या वित्तीय तक्त्यात व्यवस्थापनाने दर्शवून सुध्दा चालू लेखापरिक्षणात वित्तीय तक्त्यांमध्ये दर्शविलेली नाही. यामध्ये आकस्मित निधि किती मर्यादेपर्यंत अंतर्भूत होऊ शकेल हे निश्चित करण्यास आम्ही असमर्थ आहोत. तसेच अतिक्रमण जमीन परत घेणे करीता घेतलेल्या प्रयत्नांची माहिती आम्हास दिली नसल्याने आम्ही या प्रक्रियेत काही त्रुटी आहेत अथवा नाहीत याबाबतचे अभिप्राय देणेस असमर्थ आहोत.
कंपनीने हानी पोहोचविणारी बाबत तरतूद केलेली नाही तथापि लेख्यांचे प्रमाणिकरण २८ प्रमाणे अशी तरतूद लेखे पुस्तकात करणेची आवश्यकता आहे.

**८.** खंडकऱ्यांना जमीन वाटपाबाबतची संपूर्ण पध्दत किंवा त्याबाबतची कायदेशीर बाबींची पुर्तता आम्ही तपासलेली नाही

**९.** अनुसूची क्र. ७ मध्ये चालू नसलेली गुंतवणूक यामध्ये बहुतांश यादीत नसलेले इक्विटी भाग आहेत की ज्यांचे बाजारात सक्रिय असलेले अस्तित्व नाही. म्हणून त्यांचे योग्य मुल्य लगेच उपलब्ध होवू शकत नाही. गुंतवणूकीच्या मुल्यात घट होते यास व्यवस्थापन सहमत आहे. तथापि मुल्यामधील घट ही तात्पुरती स्वरूपाची असते म्हणून या गुंतवणूकी मधील घट बाबत तरतूद केली नाही असे मत आहे.

**१०.** अनुसूची क्र. ७ मधील टिप क्र. ७ पहावी - लेखापरिक्षण वर्षात कोपरगाव स.सा.का.लि. कडून येणे असलेली थकित व्याजाच्या रकमेच्या बदल्यात महामंडळास कारखान्याचे भाग दिले आहेत. या तारखेपर्यंत प्रत्यक्ष स्वरुपात भाग प्रमाणपत्र कंपनीकडे उपलब्ध नाहीत. तसेच या व्यवहारातील उत्पन्नाची रक्कम वर्ग करणेबाबतची कागदपत्रे अथवा त्याबाबतची मान्यता कंपनीकडून मिळाली नाहीत.

**११.** कंपनीने अनुसूची ९ आणि अनुसूची १५ वस्तूसुची मध्ये वृक्ष शेती आणि फलोद्यान म्हणून दर्शविली असून अनेक ठिकाणी आहे. त्यामध्ये रु. ७४,२६,५५७/- रकमेचा उभे पिक म्हणून समाविष्ट आहे. तथापि आमचे मते

त्याचे मुल्यांकन करणेकरिता कंपनीने स्विकारलेले लेख्यांचे धोरण आणि पद्धत ही लेख्यांचे प्रमाणीकरण-२ बरोबर जूळत नाही कारण -

१. व्यवस्थापनाने वस्तुसूची ची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. तसेच संख्यात्मक रेकॉर्ड आणि त्याचे मुल्यांकन आम्हाला उपलब्ध करुन दिले नाही. व्यवस्थापनाने कंपनीचे आकारमान आणि व्यवसायाचे स्वरूपास अनुसरुन वस्तूसूची ची प्रत्यक्ष पडताळणीकरीता अनुसरुन केलेली पध्दत अपूरी असलेबाबत आमचे मत आहे.

२. वृक्षशेती आणि फलोद्यान यांचे सुरवातीचे शिलकीचे मुल्यांकन हे सुरुवातीपासून झालेला एकूण खर्च असून अखेरील शिलकीचे मुल्यांकन काढताना सुरुवातीचे शिलकीमधून चालू वर्षातील वृक्षशेती विक्री किंमत कमी करुन काढलेली आहे. आमचे मते कंपनीने वापरलेले सदर लेख्यांचे धोरण उचित नाही.

**१२.** ताळेबंदात (अनुसूची १० नूसार) दर्शविलेली व्यापारी येणी/इतर येणी (रु. ४२,११,१४,५८५/-) यामध्ये येण्याचा मोठा भाग हा तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असून न्याय प्रविष्ट आहेत. त्याबाबत कंपनीने रुजूवात केलेली नाही. या शिल्लकी येणे रक्कमांची ताळमेळ केलेला नाही. त्याचा ताळमेळ केलेला नसल्याने तसेच विशेषत: त्या येणे रक्कमा दिर्घ कालावधीच्या असल्याने त्याचा परिणाम निश्चित करता येणे शक्य नाही. शिल्लकी येणे रकमांची वसूली करणेसाठी कोणतेही न्यायालयीन कार्यवाही केलेली नाही.

**१३.** या वर्षात कंपनीला अनेक ऋणकोकडून बँक खातेत रक्कम रु. ३३,२४४/- बँक हस्तांतरणाने जमा झालेली असून ती येणी कोणाकडून मिळाली याची कंपनीस माहिती नाही. म्हणून ती रक्कम अन ट्रेसेबल खातेत दर्शवून अनुसूची ३ (क) मुद्या क्र. ३ मध्ये सुरक्षा ठेव म्हणून दर्शविली आहे. ३१ मार्च २०१९ रोजी अखेरची शिल्लक रु. ३,८३,२४४/- आहे. तथापि, सदर रक्कम ही चालू येणे ची मिळाली असून ती सुरक्षा ठेव स्वरुपाची जमा नाही. सदर विषय काळजी घेऊन योग्य पध्दतीने हाताळणेची कंपनीने काळजी घेतली पाहिजे.

**१४.** अल्प मुदतीची कर्जे आणि अग्रिम (अनुसूची १२) मध्ये कंत्राटदार विरुध्द दावा करणे करीता कंपनीने रु. ८०,३०,०००/- न्यायालयात जमा केली आहे. जर कंपनीने दावा जिंकला तर सदर रक्कम वसूल होऊ शकणारी असुनही कंपनीने त्याचे वर्गीकरण हे प्रतिभूत अग्रिम म्हणून केले आहे.

**१५.** तसेच अनुसूची १२ मध्ये दर्शविलेली अल्प मुदतीची कर्जे व अग्रिम बाबतही कोणत्याही पार्टी/ ऋणकोकडून रुजूवात केलेली नाही.

**१६.** अनुसूची १२ मध्ये दर्शविलेली अल्प मुदतीची कर्जे व अग्रिम मध्ये रक्कम रुपये १,०४,९०,७५४/- एकवर्षा पेक्षा अधिक व तीन वर्षापेक्षा कमी आणि रु. १,९७,५३,४२९/- तीन वर्षापेक्षा जास्ती कालावधीची येणे आहेत. तरीही व्यवस्थापनाचे मते सन १९-२० या आर्थिक वर्षात वसूल होतील म्हणून ते अल्प मुदतीचे आहेत.

**१७.** तसेच अनुसूची क्र. १०, व्यापारी येणे मध्ये सहा महिन्यापेक्षा जास्त परंतू तीन वर्षा पेक्षा कमी रु. ४,१४,४८,६३४/- येणी असून तीन वर्षापेक्षा जास्त असलेली येणी रु. ३६,४७,८७,८५३/- आहेत. तथापि, व्यवस्थापनाचे मते सदर येणे सन १९-२० या आर्थिक वर्षात वसूल होतील म्हणून ती अल्पमुदतीची आहेत. मागील आर्थिक वर्षाशी तुलना करता तीन वर्षापेक्षा जास्त असलेली येणे रकमेत वाढ झालेली आहे. रक्कम रु. ३६,४७,८७,८५३/- मध्ये समावेश असलेली रु. १३९.५० लाख रकमे संदर्भात कंपनीने वसूलीसाठी कोणताही न्यायालयीन कार्यवाही केलेली नाही. याचा विचार करुन आणि मिळालेल्या माहितीच्या आधारावर, तीन वर्षापेक्षा जास्त असलेली येणे रक्कम चालू नसलेली मत्ता या लेखाशिर्षाखाली वित्तीय तक्त्यात वर्गीकरण करणे आवश्यक आहे.

**१८.** कंपनीने दोन्ही (अल्प मुदतीची कर्जे व अग्रिम आणि व्यापारी येणे) बाबतचे वसूली साठी अमलात आणलेल्या पध्दतीबाबत आम्हाला माहित नाही. म्हणून ते प्रतिभूत आहेत यावर आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही. कंपनीने स्वत:च अल्प मुदतीची कर्जे व अग्रिम रु. ५,९६,३८३/- आणि व्यापारी येणी रु. १०,१३,५६,९७७/- शंकास्पद असलेचे वर्गीकरण केले आहे.

**१९.** आम्हास असे सांगण्यात आले कि किरकोळ ऋणकोकडून सहा महिने पेक्षा जास्त कालावधीचे येणे रक्कम रु. २९,१९,५६,३०४/- ही अनुसूची क्र. १० मध्ये समाविष्ट असून सदर रक्कम ही, ऊसाची येणे उशीराने मिळालेल्या रकमेवरील व्याजाची आहे. सदर रकमा न्यायप्रविष्ट असल्याने रक्कम वसूल होऊ शकेल. म्हणून व्यवस्थापनाचे मते, संचित व्याज येणे रक्कम ताळेबंदामध्ये मत्ता म्हणून दर्शविली आहे. त्याचबरोबर न्यायप्रविष्ट रक्कमा वसुल झाल्याशिवाय पुढील व्याजाची खात्री नसल्याने व्याज उत्पन्न दाखविणे योग्य नसलेबाबत, व्यवस्थापनाचा दृष्टीकोन आहे.

**२०.** अनुसूची ५ मध्ये दर्शविलेली दृश्य मत्तावरील घसारा रक्कम ही एस एल एम (सरळ) पध्दतीने काढलेली आहे. तथापि सदर घसारा रक्कम ही कंपनी कायदा २०१३ अनुसूची २ मधील भाग क मधील घसाराचे दरा नूसार नाही. यामधील अनेक मत्तांचे वापरण्याजोगे आयुष्य हे आयुष्यमाना पेक्षाही जास्तीचे आहेत. आमचे मते जर कंपनीला जे विशिष्ट नमुद केलेल्या वापरण्याजोगे आयुष्यमान बाबतची वेगळी पध्दत वापरावी असे वाटत असेल तर तज्ञ सल्लागार यांचे आधारावर याबाबत समर्थन देणेची आवश्यकता आहे. तथापि त्याप्रमाणे केलेली नाही.

**२१.** आयकर कायदा १९६१ आणि कंपनी कायदा २०१३ यामध्ये घसारा बाबत काळाचा (टायमिंग) फरक असल्याने लेख्यांचे प्रमाणिकरण - २२ नूसार उत्पन्ना वरील करांचे लेखांकन करताना मत्ता किंवा दायित्व म्हणून स्थगित कर असायला पाहिजे. तथापि कंपनीने स्थगित कराची कोणतीही तरतूद केलेली नाही हे लेख्यांचे धोरण उचित नाही.

**२२. मान्य सांविधिक देणी लेख्यात घेतली नाहीत.**

अ) कंपनीने नियमानूसार आयकर, जीएसटी, व्यवसाय कर आणि इतर सर्व कराबाबतची दायित्वे कंपनीने परिगणना करुन अदा केली आहेत.

ब) आम्हास सांगितले की सेनापती बापट रोड, पुणे येथील इमारतीमधील इतर शासकीय आणि वित्तीय संस्था यांना दिलेल्या भाडे पट्ट्यावरील शहरी जमीनीचा जीएसटी कंपनीने अदा केला आहे. तथापि मोकळी जागा (सेनापती बापट रोड, पुणे जवळील शहरी जमीन तसेच मळ्यावरील रोडला लागून असलेल्या ग्रामीण जमीनी) भाडयाने दिलेले बरेच भाडेपट्टाधारक असून त्या जागा व्यापारी उद्देशाने वापरीत असले तरी करार मोकळया जागेचा असल्याने त्यास जीएसटी लागू होत नाही. त्यामुळे वापरमूल्याने कराराने दिलेल्या मोकळया जागा शेतीसाठी वापरल्या किंवा नाही त्यावर जीएसटी नाही असा दृष्टीकोन आहे. आमचे दृष्टीकोनातून जर या जमीनी शेतीसाठी आणि शेती संलग्न कामाकरीता वापरल्यास जीएसटी मधून तसेच आयकरामधून सूट आहे. परंतू या जमीनी व्यापारी उद्देशासाठी वापरात असल्याने आमचे दृष्टीकोनातून कंपनीचे म्हणणे चूकीचे असून आयकर आणि जीएसटी दायित्वाबाबत कसूरदार आहे.

क) संयुक्त शेती धारकाकडून रक्कम अदा करताना कसूर किंवा विलंब केल्यास कंपनीने करारानूसार व्याज आणि दंड रु. १९,२२,६८७/- (अनुसूची क्र. १४ मुद्दा क्र. २ - इतर व्याज) आकारणी केली आहे. तथापि, जीएसटी तसेच आयकर परिगणना करताना ती संयुक्त शेती धारकाकडून जमा झाली असल्याने कृषी उत्पन्न म्हणून ग्राह्य धरली आहे. आमचे मते जरी संयुक्त शेती धारक मुख्यत्वे शेतीसाठी कार्यरत असले तरी वसूल केलेले दंडणीय व्याज हे शेती संबंधित होऊ शकत नाही. म्हणून कंपनीचे म्हणणे चूकीचे आहे आणि कंपनी जीएसटी आणि आयकर दायित्व बाबत कसूरदार आहे.

ड) आमचे माहितीप्रमाणे राज्य शासनाने कंपनीस पगार रक्कम (व्यवसाय उद्देशाने) अदा करणेकरीता कर्ज दिली आहेत. कंपनीचा व्यवसाय शेती करणे किंवा शेतीपूरक कि ज्यास सुट आहे. कर्ज रक्कमेवरील व्याज हे शासनास देय दाखवून तो खर्चामध्ये लेखे पुस्तकात कंपनीने दर्शविला आहे. चालू वर्षात कंपनीने कृषी व्यवसायातून आकारानूसार उलाढाल केली आणि नफ्यात आहे. व्याज खर्च शेती उत्पन्न संबंधीत असल्याने सुट आहे. तथापि, कंपनीने मुदत ठेवी पासून मिळालेले व्याज उत्पन्न यामध्ये शासनास देय व्याज समायोजित केले आहे, कि जे व्यवसायाचा भाग नसून त्यावर आयकर लागतो आहे. करपात्र उत्पन्नाची आयकर परिगणना करताना सुट दिलेल्या उत्पन्नाबाबत केलेले खर्च नाकारायला पाहिजे. म्हणून कंपनीने केलेली आयकराची परिगणना हि पडताळणी शिवाय आहे.

इ) यापुढे जरी उत्पन्नापोटी सुट दिलेले खर्च केले नाहीत हे कंपनीचे म्हणणे स्विकारले तर कंपनीने वापरमूल्या पासून मिळालेल्या उत्पनातून तेच खर्च आयकर दायित्वामधून का कमी केले नाही याबाबत स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. कारण व्यवसायाशी संबंधित नसलेला तोटा हा हाऊस प्रॉपट्रीपासून मिळालेल्या उत्पनातून कमी करु शकतो. तसेच शिल्लक रक्कम पुढील वर्षाकरीता वर्ग करता येते. अशा प्रकारे आम्ही कंपनीचे आयकर परिगणने बाबत समाधानी नाहीत.

फ) आम्ही संविधानिक दायित्वे म्हणजेच मत्ता कर, दूरध्वनी बिले, इलेक्ट्रीकल बिले नियमित अदा केली असून कसूरदार नाहीत या व्यवस्थापनाचे म्हणणे यावर आम्ही विश्वास ठेवतो.

**२३. लेख्यांचे प्रमाणीकरण २९ नूसार आकस्मिक दायित्व**

अ) सेल्स टॅक्स/व्हॅट बाबत देणे रक्कम रु. १,७३,५२६/- ची तरतूद अनुसूची ४ क - इतर चालू दायित्वे मध्ये केली आहे. तथापि व्हॅट बाबत पडताळणी आदेश आणि इतर कागदपत्रे उपलब्ध नसल्याने त्याबाबतची पुरेशी तरतूदी संबंधी आमचे अभिप्राय देवू शकत नाही.

ब) कंपनी विरुध्द प्रलंबित अनेक न्यायालयीन दावेबाबत आणि कंपनीने सुध्दा इतर पार्टी विरुध्द दाखल केलेले न्यायालयीन दावे बाबत योग्य कायदेशीर मत मिळाले नसल्यामुळे आम्ही त्याचा परिणाम समाधानपूर्वक निश्चित करु शकलो नाही.

२४. कलम १८९ नूसार आवश्यक असलेले संचालकांचे हित संबंधी असलेले कंत्राट किंवा करार बाबतचे रजिस्टर कंपनीने ठेवलेले नाही. तथापि याबाबतीत कंपनीच्या कोणत्याही करार आणि कंत्राट यामध्ये कंपनीच्या संचालकांचे हित संबंध नाहीत असे स्पष्टीकरण व्यवस्थापनाकडून आम्हास मिळाले आहे.

२५. लेख्यांचे प्रमाणीकरण १८ नूसार मुख्य व्यवस्थापन व्यक्तीचे मिळकतीबाबत आणि संबंधित असलेले पार्टी व्यवहाराबाबत तपशील दर्शविणे कायद्याने आवश्यक असून कंपनीने त्याबाबत पुरेसे प्रकटीकरण केलेले नाही.

## उचित मत :

वर उल्लेख केलेल्या उचित मत बाबतचे आधार व्यतिरीक्त आमचे मते आणि आमचे माहितीनूसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणास अनूसरुन दिनांक ३१ मार्च २०१९ रोजीची दर्शविलेली वित्तीय तक्ते हे कायद्यानूसार आवश्यक असलेल्या पध्दतीने माहिती दर्शवितात आणि सर्व साधारणपणे भारतातील कंपनी राज्य कारभाराची स्विकृत असलेल्या लेख्यांचे तत्वे विचारात घेता आवश्यक असलेली सत्यता आणि योग्यता दर्शवितात.

**महत्वाच्या बाबी बाबत :**

**१. खंडकऱ्यांना अदा करावयाचे भाडेपट्टा बाबत लेखांकन केले नसले बाबत -**

आम्हास असे सांगण्यात आले की, १९८२ पर्यंत खंडकऱ्यांना भाडे पट्टा देण्यात आला होता. त्यानंतरही जमीनी महामंडळाच्या ताब्यात आणि वापरात असूनही त्यांचे भाडे पट्टा रक्कम अदा केली नाही, तसेच त्याची तरतूदही केलेली नाही. तथापि आम्हांला असे सांगण्यात आले की, १९८२ पर्यंत आणि त्यापूर्वी या जमीनींची महामंडळाच्या मालकीच्या नव्हत्या, म्हणून भाडे देत होतो. त्यानंतर जमीनी महामंडळाच्या मालकीच्या झाल्या तेव्हापासून भाडे अदा करणे बंद केले आहे.

**२. आकस्मिक दायित्वे -**

अनुसूची १९ वित्तीय टिपा मध्ये मुद्दा क्र. ४ क - दर्शविलेल्या आकस्मिक दायित्वामधील काही विशिष्ट प्रकरणी त्याचे (वेडी बाभूळ झाडे काढणे बाबत सह) स्वरुप व रक्कम बाबतची विशद करणारी सविस्तर आणि त्यास अनुशांगिक कागदपत्रे आमचे पडताळणी करीता उपलब्ध केले नाहीत. तथापि त्याबाबत व्यवस्थापनाने प्रकटीकरण बरोबर आणि पुरेसे आहे यावर आमचा भरवसा आहे.

**३. प्रलंबित दाव्याचा परिणाम**

कंपनीने प्रलंबित असलेल्या दाव्याचा वित्तीय तक्त्यामधील आर्थिक स्थिती वर होणाऱ्या परिणामाचे प्रकटीकरण समर्पक केलेले नाही. आमचे मते कंपनी विरूध्द प्रलंबित असलेल्या अनेक दाव्याची यादी असून त्याबाबतचे कायदेशीर मत द्यावयास पाहिजे होते.

**४. संचित तोटा**

कंपनीचा संचित तोटा दि. ३१ मार्च २०१९ च्या वर्ष अखेरीस रक्कम रु. १,७६,४२,५९,७५०/- असून ती निव्वळ मुल्यापेक्षा जास्तीची आहे. तथापि शासकीय कंपनी असल्याने तोटा हा शासनाच्या निधी आणि कर्जात समायोजित होणारा आहे. त्यामुळे संस्था चालू राहील हया समज बाबत शंका नाही. या बाबीचा वित्तीय तक्त्यावर होणारा परिणाम निश्चित करता येत नाही.

**५. महामंडळ नियमन:-** चांगले नियमन नसलेबाबतचे खालील उदाहरणार्थ

अ) फार पूर्वीची शुल्लक देय/येणी रक्कमांचे समायोजन आणि दुरूस्ती न करता पुढे चालू ठेवणे.

ब) लेख्यांचे धोरण प्रभावी नसणे, विशेषत: जमीन संबंधी.

क) खाते मध्ये घेतलेले काही खर्चाचे आणि ताळेबंदातील बाकीच्या लेख्यांचे प्रमाणीकरण अनुसरुन नाहीत.

ड) या आधी उल्लेख केलेनूसार विशिष्ट सांविधानिक देणी अदा केलेली नाहीत.

इ) आमचे मते या आधी उल्लेख केलेनूसार बऱ्याच कायदेशीर पूर्तता आणि करांबाबत गंभीरपणे विचारात घेतली पाहिजे.

**६. शासकीय देणी**

अ) सन १९७२-१९७३ ते १९८३-१९८४ शी संबंधित असलेला वादग्रस्त कृषी आयकर रु. ३,२८,१६,४९८/- जो या तारखे पर्यंत अदा केला नाही किंवा समझोता केला नाही.

ब) त्याच प्रमाणे व्हॅट दायित्व रु. ५६,४१९/- तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीचे देणे प्रलंबित आहे.

**७. हस्तलिखित लेखांकन -**

कंपनीने लेख्यांची पुस्तके ही हस्तलिखित नमून्यात ठेवलेली आहेत. ती मळा आणि एकत्रिकरण पर्यंत ताळमेळ घेणेची आवश्यकता आहे. आणि नंतर कंपनी कायदानूसार तयार करतात. त्यामुळे कारण नसताना अवघड लेखांकन होऊन त्यामुळे काही गोष्टी वगळणे किंवा समावेश होणे संबंधी त्रुटी होण्याची शक्यता असते.

**एम. एस. गोडबोले आणि असोसिएटस, करिता.**
**सनदी लेखापाल**
**फर्म नोंदणी नं. : १०३२३६ डब्ल्यु**

**सील सही**
**चिन्मय डी. करांडे**
**भागीदार**
**सभासद नोंदणी नं. (१५७७००)**

**ठिकाण : पुणे**
**दिनांक : १५-१०-२०२०**
**युडीआयएन - २०१५७७००एएएएडब्ल्युजी६६२१**

## इतर कायदेशीर बाबी आणि नियमानुसार आवश्यकतेवरील अहवाल

**१.** कंपनीचा (लेखापरिक्षकांचा अहवाल) आदेश २०१६ आदेशानुसार तसेच भारताचे केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या या कायद्याची कलम १४३ चे उपकलम (११) यास अनुसरुनआम्ही आमची अनुसूची अ दिलेली आहे आणि या कायद्याच्या मुद्दा क्र. ३ व ४ मध्ये नमुद केलेल्या बाबींवर मत दिले आहे.

**२. कायद्याचे कलम १४३(३) प्रमाणे आवश्यक अहवाल आम्ही देत आहोत.**

अ) आमचे लेखापरिक्षणास आवश्यक असलेली आमचे माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्ही पाहिली आहेत. तथापि अपूरे रेकॉर्ड ठेवलेले असल्याने आवश्यक असलेली काही माहिती कंपनी उपलब्ध करु शकली नाही.

ब) महत्वाच्या बाबी बाबत मधील मुद्दा क्र. ७ शिवाय आमचे मते कायद्यानुसार आवश्यक असलेली योग्य ती लेखा पुस्तके ठेवलेली आहेत. असे आम्हाला लेखा पुस्तकांची तपासणी करतांना दिसून आले आहे.

क) कंपनीचे व्यवहार अनेक ठिकाणी आहेत. तथापि शाखेकरीता स्वतंत्र लेखा परिक्षकाची नेमणूक केलेली नाही. सर्व शाखांचे हस्तलिखित रेकॉर्ड आणि वित्तीय तक्त्यांचे संकलन लेखा परिक्षकास सादर केले.

ड) कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असणारी योग्य लेख्याची पुस्तके ठेवलेली आहेत. तथापि त्यामध्ये काही त्रुटी असून अनेक लेख्यांचे प्रमाणीकरण नियमांची पुर्तता त्यात होत नाही. तसेच काही धोरणे उदा. घसारा बाबतची परिगणना ही नवीन कंपनी कायदा, २०१३ ला अनुसरून न करता कंपनी जूने लेख्यांची धोरणे चालू ठेवत आहे.

ई) आमचे मते दर्शविलेली वित्तीय तक्ते हे कंपनीज (लेखा) नियम, २०१४ चे नियम ७ प्रमाणे या कायद्याचे कलम १३३ मधील लेख्यांचे प्रमाणीकरण मध्ये नमुद केले प्रमाणे पुर्तता करीत नाहीत.

फ) आमचे मते वरील मुद्यांमध्ये, उचित मतबाबतचा आधार आणि महत्वाचे बाबी बाबत मध्ये विशद केलेल्या बाबींचा कंपनीच्या कामकाजावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

ग) कंपनीचे संचालकांची नियुक्ती महाराष्ट्र शासनाकडून केली जाते. कलम १६४(१) आणि १६४(२) मधील अटीचा भंग नियुक्त केलेल्या व्यक्तिकडून होत नाही म्हणून नियुक्त केलेले संचालक हे अनर्हता होत नाहीत. या व्यवस्थापनाने दिलेल्या स्पष्टीकरणावर आम्ही विश्वास ठेवला आहे.

ह) लेखे ठेवणेबाबत आणि त्यासंबंधी असलेला बाबी बाबत सर्व अर्हता, मर्यादा आणि प्रतिकूल शेरा हा उचित आधार आणि महत्वाच्या बाबी मधील मुद्यांमधून समोर ठेवला आहे.

ज) योग्य नोंदी नसल्याने, कंपनीच्या अनेक मळयावरील नोंदलेल्या प्रत्येक व्यवहाराबाबतची पुरेशी खात्री करून घेता येत नव्हती. व्यवस्थापनाचे मते वित्तीय व्यवहार एकाच मध्यवर्ती ठिकाणापासून नियंत्रित केले जात असून अंतर्गत वित्तीय नियंत्रण पुरेसे आहे. व्यवस्थापनाने दिलेल्या स्पष्टीकरणा नूसार कंपनीने पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रण ठेवले आहे यावर आम्ही विश्वास ठेवला आहे.

**३. आम्ही कंपनी कायदा १४३ (५) अन्वये आवश्यक अहवाल**

**अ) येणी/कर्जे/व्याज ई. निर्लेखित केली/माफ केली बाबत अभिप्राय.**

१. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे लेखे कालावधी मध्ये कंपनीने येणी/कर्जे/व्याज इ. निर्लेखित केली नाहीत/माफ केली नाहीत.

२. यापूर्वी कंपनीने सन १९६३ पासून पगार, व्यवस्थापन आणि दैनंदिन खर्च भागविणे करीता महाराष्ट्र शासनाकडून कर्जे घेतली आहेत. अनुसूची क्र. ४ अ अन्वये दि. ३१ मार्च, २०१९ रोजी एकूण कर्जे रु. १,५५,९२,४९,९२०/- अदत्त बाकी आहे.

३. प्रथम मुद्दल अदा करुन नंतर त्यावरील व्याज अदा करणेचे धोरण कंपनीने अवलंबिले आहे.

**ब) तिसऱ्या पार्टिकडे असलेला वस्तू सूचीचा साठा आणि शासन किंवा इतर प्राधिकारात बक्षिस म्हणून मिळालेल्या मत्तांबाबतचे नोंदी बाबत अभिप्राय-**

१. चालू वर्षात कंपनीने तिसऱ्या पार्टिकडे कोणताही वस्तू सूचीचा साठा ठेवलेला नाही तसेच शासनाकडून आणि इतर प्राधिकारात कोणतीही  मत्ता बक्षिस म्हणून कंपनीस मिळालेली नाही.

क) वयानूसार प्रलंबित कायदेशीर/लवाद प्रकरणे तसेच प्रकरणांचे प्रलंबित कारणांसह आणि सर्व  कायदेशीर प्रकरणांवरील खर्चावर प्रत्यक्ष/परिणामकारक  देखरेखीची  कार्यपध्दत बाबत अहवाल.

| | **वर्ष** | **उच्च न्यायालय** | **सिव्हील न्यायालय** | **जिल्हा न्यायालय** | **क्रिमिनल न्यायालय** | **कामगार/ इंडस्ट्रियल न्यायालय** | **रेव्हेन्यू न्यायालय प्राधिकृत** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०११ | - | ०१ | - | - | - | - | ०१ |
| २ | २०१२ | ०२ | ०४ | ०१ | - | - | - | ०७ |
| ३ | २०१३ | - | २० | - | - | - | ०१ | २१ |
| ४ | २०१४ | १४ | १७ | ०१ | - | - | ०१ | ३३ |
| ५ | २०१५ | १३ | १९ | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ३८ |
| ६ | २०१६ | ०७ | १६ | ०७ | ०१ | ०६ | - | ३७ |
| ७ | २०१७ | ११ | १३ | ०६ | - | ०१ | ०१ | ३२ |
| ८ | २०१८ | ०७ | १८ | १२ | ०९ | ११ | ०७ | ६४ |
| ९ | २०१९ | ०७ | २४ | १० | २१ | १६ | ०७ | ८५ |
| १० | २०२० | ०२ | ०४ | ०२ | ०९ | - | ०४ | २१ |
| **एकूण** | | | | | | | | **३३९** |

टिप-

